# प्रकाशमार्ग

Volume 3 Issue 9 JUNE 2011 Rs. 15

प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

**ऋषींनी शिकवले तसे आम्ही ध्यान शिकवतो.**

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
★ शांतता ही आपली भाषा आहे
★ ध्यान हा आपला मार्ग आहे
★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

## चिंतन

महर्षी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

मागील काही दिवसांपासून आपण विविध घोटाळे, आतंकवाद्यांचे लपण्याचे ठिकाण इत्यादी अशा कित्येक अप्रिय असल्या तरी सत्य गोष्टी उघडकीस येताना पाहत आहोत. मी फार पूर्वीपासून हे म्हणत आलो आहे की, सत्य गोष्टी उघडकीस येण्याचा हा काळ आहे. सत्य गोष्टी उघडकीस येणे, हा एका मोठ्या शुद्धीकरणाच्या प्रक्रियेचा एक भाग आहे. शुद्धीकरणाची प्रक्रिया ही नवयुगाकडे घेऊन जाणाऱ्या परिवर्तनाच्या प्रक्रियांपैकी एक आहे. नवयुग हे शुद्धतेचे, सत्याचे युग आहे. नवयुगात अशुद्ध गोष्टी आणि असत्य टिकू शकत नाही. अशा गोष्टींना परिवर्तनाच्या दरम्यानच काढून टाकावे लागते. आणि म्हणूनच गोष्टी उघडकीस येण्याला आधी सुरुवात होत असते.

सत्यं सामोरी येणे, हे जागतिक, राष्ट्रीय आणि वैयक्तिक अशा सर्व पातळ्यांवर घडते आहे. आपण ह्या गोष्टीची दखल घ्यायला हवी. चालू असलेल्या कित्येक आध्यात्मिक प्रक्रियांची दखल या जगाने घ्यायला हवी.

कित्येक वेगवेगळ्या शक्ती सध्या या पृथ्वीवर कार्यरत आहेत. या शक्तींपैकी तीन महत्त्वाच्या शक्ती आहेत – शंबलातील शक्ती, फोटॉन बेल्टच्या प्रभामंडलातून मिळणाऱ्या शक्ती आणि ऋषींनी २००९ साली 'रा' ब्रह्माच्या स्रोतापासून आणलेल्या 'महान रा' च्या शक्ती. सत्य गोष्टी उघडकीस येणे, हा या शक्तींच्या कार्यरत असण्याचा परिणाम आहे.

जेव्हा सत्य उघडकीस येते, जेव्हा आपण असत्य आणि अशुद्धतेची दखल घेतो, तेव्हा आपण मनापासून या गोष्टींना आधी नाकारायला हवे आणि मग शुद्धीकरणासाठी आपापल्या परीने प्रयत्न करायला हवे. मतदानापलीकडे काहीही करू न शकणाऱ्या व संपूर्णपणे अगतिक असणाऱ्या आपण हे लक्षात घ्यायला हवे की प्रत्यक्षात आपण अगतिक नाही. आपण शक्तींच्या पातळीवर कार्य करू शकतो. आपण ध्यान करू शकतो व प्रकाश प्रवाहित करू शकतो. त्यातून उत्पन्न होणाऱ्या शक्ती सर्व तऱ्हेचे बदल घडवतात. सध्या जे मोठे बदल आपण पाहत आहोत, हे जगभरातील लाखो लोकांच्या ध्यान करण्याचा आणि प्रकाश प्रवाहित करण्याचा परिणाम आहे.

कोणाला या गोष्टींवर विश्वास बसो वा न बसो, त्यामुळे काही फरक पडत नाही. या सत्य गोष्टी आहेत. अशा सत्यांबद्दल बोलण्याची आणि अशा सत्यांना लोकांपर्यंत पोचवण्याची वेळ आता आली आहे. मीडिया हे काम करत नाही. त्याचा स्वतःचा वेगळाच हेतू असतो.

सध्या आपण फारंच रोमहर्षक काळातून जात आहोत. खूप लोक शक्ती प्रवाहित करण्याच्या, नवे ज्ञान प्रवाहित करण्याच्या आणि या जगाला नवयुगात प्रवेश करण्यासाठी तयार करण्याच्या कार्यात गुंतलेले आहेत. या सत्यांबद्दल सर्वांनाच कळायला हवे.

शंबलातील लोक त्यांच्या पूर्वानुभवावरून आणि त्यांच्याजवळ असलेल्या विवेकाच्या आधारे आपल्याला मदत करायला तयार आहेत. त्यांनी यापूर्वीच्या काळात पुष्कळदा नवयुगाचा उदय होताना आणि फोटॉन बेल्टमध्ये आपला प्रवेश झालेला पाहिला आहे. आपण त्यांच्याशी संपर्क साधून त्यांची मदत घेणे शिकायला हवे. वरील सूक्ष्मलोकांत आणि इतर उच्च लोकांत राहणाऱ्या लोकांशी संपर्क साधणे आपण शिकायला हवे. वरील कित्येक लोकांचे गट आपल्याशी संपर्क साधण्यासाठी आणि आपली मदत करण्यासाठी तत्पर आहेत.

वर्तमान काळातील वास्तवांची दखल घेण्याची, जागृत होऊन प्रकाशाचा पाठपुरावा करण्याची वेळ आता आली आहे. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, २२७१५५०१, ९३४२० ३०२५० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे


**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. २००/–**
**ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाऊंडेशन च्या नावाने काढावा.**
**कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

## वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.




**२७–४–२०११, गुरुजी, बंगलोरमधील स्ट्रॅण्ड बुक हाउस येथे 'पुस्तक वाचन' समारंभात बोलताना**

## काही ठळक घडामोडी

- २७–४–२०११ रोजी, स्ट्रॅण्ड बुक हाउस, बंगलोर येथे आयोजित केलेल्या 'पुस्तक वाचन' सत्रात गुरुजींनी राघवेंद्र सोमयाजी लिखित "Preparing for 2012" या पुस्तकाचे प्रकाशन केले.
- ८–५–२०११ रोजी शंबला गटाने आणि १५–५–२०११ रोजी 'रा' गटाने तपोनगरात जमून गुरुजींकडून दीक्षा आणि मार्गदर्शन घेतले.
- १७–५–२०११ रोजी तपोनगर येथे मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत बुद्ध पौर्णिमेनिमित्त विशेष ध्यान आयोजित करण्यात आले.
- पिरॅमिड व्हॅली, बंगलोर येथे १७–५–२०११ रोजी बुद्ध पौर्णिमेनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात गुरुजींनी भाग घेऊन व्याख्यान दिले.
- १८–५–२०११ रोजी आनेकल येथील आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्रात आणि २२–५–२०११ रोजी तपोनगरात गुरुजींचा वाढदिवस साजरा करण्यात आला.
- तपोनगरवासींनी १८–५–२०११ च्या रात्री तपोनगरात गुरुजींचा वाढदिवस साजरा केला.
- "Preparing for 2012" ह्या पुस्तकाचा कन्नड भाषेतील अनुवाद १८–५–२०११ रोजी आनेकल येथे झालेल्या गुरुजींच्या वाढदिवस समारंभात प्रकाशित करण्यात आला.

## रविवारच्या प्रसादाचे प्रायोजक

पुंडलिक सौरभ आणि सीमांतिनी,
पद्मिनी एस., मल्लिका के.,
सीमा डी. एम. ०३–४–२०११
मधुकर गोडसे, नलिनी राजशेखर,
विजयकुमार, आनंद निरंजन,
अंजली मांडके १०–४–२०११
रंजना गोडसे, रेबोनी रे, के.सी.पानी,
बिंदू माधवी मांडके १७–४–२०११
संध्या साठे, सुनिता मदन,
उषा खडके, पद्मावती मुनिराजू २४–४–२०११

**रू. २००० देऊन रविवारच्या प्रसादाचे आणि रू. ५००० देऊन वृत्तपत्राचे प्रायोजक आपण होऊ शकता.**

## तपोनगरातील कार्यक्रम

| | |
|---|---|
| दर रविवारी | – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत<br>– विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| गुरुवार ०२ | – सूर्य ग्रहण: ०.५५ (१ तारखेच्या मध्यरात्रीनंतर) ते पहाटे ४.३६ पर्यंत |
| बुधवार १५ | – खग्रास चंद्र ग्रहण: रात्री १०.५४ ते १६ तारखेच्या पहाटे ४.४० पर्यंत |

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | |
|---|---|
| १ बुधवार | अमावास्या |
| २ गुरुवार | सूर्य ग्रहण:<br>१ तारखेच्या मध्यरात्री नंतर<br>०.५५ ते २ तारखेच्या पहाटे<br>४.३६ पर्यंत |
| ४ शनिवार | भगवान कल्की यांचा वाढदिवस |
| ९ गुरुवार | शुक्लाष्टमी |
| ११ शनिवार | शुक्ल दशमी |
| १५ बुधवार | पौर्णिमा खग्रास चंद्र ग्रहण:<br>रात्री १०.५४ ते १६ तारखेच्या<br>पहाटे ४.४० पर्यंत |
| २३ गुरुवार | कृष्णाष्टमी |
| २९ बुधवार | शिवरात्री |

गुरुजींसोबत अनौपचारिक बैठक शनिवार, ११–६–२०११ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.

स्पीकिंग ट्री वर मास्टर्सच्या सूचीत गुरुजींचे नाव आले आहे. त्यांचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.

गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई–मेल द्वारा संपर्क साधावा.

## "लाईट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट" बद्दल वृत्तांत

- उन्हाळ्याच्या सुट्ट्यांसाठी जरी शाळा बंद असल्या तरी आपले स्वयंसेवक काम करीत आहेत. ते समर कॅम्प्स मध्ये मुलांना शिकवत आहेत. स्वतःच्या घरांतून व संस्थांतून प्रवहनाची सत्रे चालवण्यासाठी इच्छुक लोकांच्या मदतीने ते नवीन प्रकाश प्रवहन केंद्रे देखील उघडत आहेत.
- मुंबई, मैसूर आणि बंगलोर मधील ह्या नवीन केंद्रांच्या आजूबाजूच्या भागांतील अनेक लोक साप्ताहिक सत्रात सामील होऊन ह्या महान चळवळीत भाग घेत आहेत. ■

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

आम्हाला खूप शीतल वाटले. प्रकाश प्रवहनाचा हा उत्साहवर्धक प्रयोग केल्यानंतर शांतता आणि सहनशीलता वाढली आहे. अलीकडे मुले शांत झाली आहेत. भांडणे आणि मारामारीच्या तक्रारी देखील नाहीत.

– श्रीमती मीरा देशपांडे, शिक्षिका, महाराष्ट्रीय मंडळ इंग्लिश मीडियम स्कूल, पुणे

मी ह्या तंत्राचा सराव दिवसातून दोन वेळा करतो. ह्याने माझ्या मनाच्या एकाग्रतेत सुधारणा झाली आहे आणि मी जे काही काम करतो ते आता एकाग्रतेने करू शकतो. ह्याने माझे मन व शरीर दिवसभर सर्व गोष्टींसाठी आणि कोणत्याही कार्यासाठी ताजेतवाने राहाते. रात्री झोपायच्या आधी प्रवहन केल्यास मला दिवसभरात केलेल्या गोष्टी लक्षात येतात. आता माझ्या मनात देखील चांगले विचार येतात.

– आदित्य भिंतोडे, वर्ग ८, महाराष्ट्रीय मंडळ इंग्लिश मीडियम स्कूल, पुणे

पूर्वी मला सकाळी उठल्यानंतर देखील खूप झोप यायची आणि दिवसभर थकल्यासारखे वाटायचे. पण हे ध्यान करणे सुरू केल्यापासून मला सकाळी ताजेतवाने वाटते आणि संपूर्ण दिवस खूप चांगला जातो. मी जे काम करते ते एकाग्रतेने करण्यास मला मदत होते.

– सानिका नाडगौडा, वर्ग ८, महाराष्ट्रीय मंडळ इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : पूर्वा फडके

शरीर, मन व बुद्धी यांच्या अविरत शुद्धीकरणाने आत्म्याच्या पावित्र्याची चमक आपल्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येईल. दैनंदिन ध्यानाव्यतिरिक्त गुरुजींनी आम्हाला, काही विशिष्ट दिवसांमध्ये उपलब्ध असलेल्या विशेष शक्ती ग्रहण करून आपले लवकर शुद्धीकरण करण्यासाठी, अजून काही तंत्रे शिकवली आहेत. जसं होळीच्या दिवशी काम–दहन तंत्राचा सराव केल्याने आपल्यातील निम्न भावनिक प्रवृत्तींचा नाश होण्यास मदत होते. मार्च महिन्यात तपोनगरवासीयांनी मेडिटेशन हॉलमध्ये जमून गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली २० मिनिटांसाठी या तंत्राचा सराव केला.

एप्रिल महिन्याची सुरुवात गुड–फ्रायडे निमित्त आयोजित केलेल्या ध्यानाने झाली. येशू ख्रिस्तांनी दिलेल्या क्षमाशीलतेच्या बोधाची व ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाची म्हणजेच प्रत्येक व्यक्तीत असणाऱ्या दैवी क्षमतेच्या पुनरुज्जीवनाच्या आश्वासनाची उजळणी झाली. गुढीपाडव्या निमित्त ध्यानादरम्यान आम्हाला काळासारख्या अनाकलनीय वास्तवाचा एक पैलू असणाऱ्या युगादि–पुरुषाची प्रार्थना करण्याची संधी मिळाली. रामनवमीच्या दिवशी केलेल्या ध्यानाने आम्हाला जगण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आदर्शांची आठवण करून दिली.

ओरिएंटेशन वर्गात खूप जणांनी सहभाग घेतला. ऋषींनी उच्च जगांतून विशेष करून मन व बुद्धी पदार्थ आणले आणि आमच्या सूक्ष्म शरीरात या पदार्थांची भर घातली. ती दोन तासाची एकाग्र साधना म्हणजे ऋषींचा मोठा आशीर्वादच होता आणि त्यामुळे सर्वांच्या अंतरंगात एक बदल घडला.

जनतेतील बंड, उघडकीस येणारे घोटाळे, जगातील पुष्कळ भागांत झालेले भूकंप आणि त्सुनामीमुळे उद्भवलेले मोठे आण्विक संकट, या गोष्टी युग बदलत असल्याचे पुरावे देत आहेत. तपोनगर विशेष शक्तींच्या मदतीने स्वतःला व सर्व ध्यानसाधकांना कणखर बनवत आहे. त्यामुळे आपण नुसतेच या कठीण काळातून बाहेर पडणार नाही तर आपला उत्तम विकासही होईल. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, शहाणपण आणि भवितव्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८–०५–२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

०३–०४–२०११

आपण 'प्रकाशाच्या महासागराचा अनुभव' घेण्याच्या तंत्राचा अभ्यास करून जर कोणती गोष्ट समजण्याचा प्रयत्न केला तर, ती आपल्याला जास्त समजते व अधिक चांगल्या रीतीने समजते. आपण जर एखादे पुस्तक वाचत असू तर त्या पुस्तकात न छापलेल्या गोष्टी देखील आपल्याला कळतात. यामुळे पराकोटीचा आनंद, सुख, शांती आणि सारे काही मिळते.

आपण लक्षात ठेवले पाहिजे की इथे आपण ऋषींकडून शिकण्यासाठी येतो. मी केवळ त्यांचा प्रतिनिधी आहे. ऋषी ह्या पृथ्वीशी संबंधित मोठे कार्य करीत आहेत. ध्यान शिकविणे व साधकांना तयार करणे हा त्या कार्याचा एक भाग आहे. आपण एका महान योजनेचा हिस्सा आहोत कारण, आपल्या माध्यमातून नवयुगाची स्थापना होणार आहे. आपल्यावर फार मोठी जबाबदारी आहे.

आपण हे धरून चालू की बहुतांश वेळा आपण सूक्ष्म देहाने केलेला प्रवास आपल्याला आठवत नाही किंवा सूक्ष्म जगात आपल्याला देण्यात आलेल्या सूचना आपल्याला आठवत नाहीत. आपल्यापैकी अनेकांना स्वप्नसदृश अनुभव येतात. तेव्हा ऋषींनी आपल्याला अनेक गोष्टी सांगितल्या असतात. पण, जागे झाल्यावर आपल्याला त्यातले काहीच आठवत नाही. त्याची चिंता करू नका. ह्या भौतिक पातळीवर आपल्याला जे कळणे जरुरी आहे ते कधी ना कधी, कसेही कळेलच. किंवा असे होऊ शकते की अजाणतेपणी आपण ऋषींच्या सूचना पाळत असतो. अशा तऱ्हेने, मिळणारी माहिती कधी वाया जात नाही.

सध्याच्या काळात सूक्ष्म जगतातील प्रवासावर भर नसून तो परिवर्तनावर आणि आत्मज्ञानावर आहे. एकदा हे साध्य झाले की नंतर सर्वकाही साध्य होईल. मग सूक्ष्म देहाने केलेला प्रवास आपल्याला सहज आठवेल. आपल्याला कोणत्याही विशेष तंत्रांचा अभ्यास करण्याची गरज उरणार नाही.

ऋषींच्या कार्यात सहभागी होण्यासाठी आपण नियोजनबद्ध तयारी करायला हवी. आपल्यापैकी काहीजणांनी तसे केले आहे. कार्यात सहभाग घेण्यापूर्वी आपण आपल्या जबाबदाऱ्यांतून मुक्त व्हायला हवे किंवा जबाबदाऱ्या पार पाडण्याची व्यवस्था करायला हवी. कार्यात जगाकडून अडथळा येऊ नये यासाठी जगाला थोड्या अंतरावर ठेवण्याची आपली तयारी पाहिजे. आपली कोणतीही व्यक्तिगत कार्यसूची असता कामा नये. आपण नवीन शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इथल्या कार्यासाठी ज्याची गरज नाही ते सर्वकाही बहुधा विसरण्याची तयारी ठेवली पाहिजे. माझे गुरु म्हणाले होते, "बोटी जाळून टाका." सहसा हे केले जात नाही. म्हणूनच लोक परत पाठी फिरतात.

काही लोक एका लहान समूहात एकत्र येऊन एकाच वेळी तपोनगरातील इमारतींशी सायुज्य साधून ध्यान करतात. मला वाटते की सर्वांनी या समूहात सामील व्हावे किंवा त्यांचे स्वतःचे असे समूह बनवावे.

१०–०४–२०११

तुम्ही एकटे असताना ध्यानात ठेवा की तुम्ही एकटे नाही. ध्यानात ठेवा की ईश्वर तुमच्यासोबत आहे, त्याची तुमच्यावर कृपा आहे. तुम्ही प्रकाशासोबत, ऋषींसोबत, ध्यानात, चिंतनात आणि वाचनात काळ व्यतीत करायला शिकले पाहिजे. कसलीही तक्रार करू नका की कुरकुर करू नका. तुम्ही मानवी नात्यांचा मुळीच भरवसा धरू शकत नाही. अमरांनी माझी ऋषीजगताशी ओळख करून दिली. मी कधीही एकटा नसतो.

गीतेचा एकमात्र अतिशय महत्त्वपूर्ण संदेश आहे... जीवनाला सामोरे जा, परिस्थितीशी लढा द्या. आमचा त्याच स्वरूपाचा संदेश असा आहे: परिस्थिती टाळू नका, पलायन करू नका. सांप्रतच्या संक्रमणाच्या काळात ऋषींची मदत घ्या.

'आम्ही सत्यसाईबाबांना प्रकाश व उपचारक ऊर्जा पाठवू शकतो का?' असे प्रश्न मला विचारण्यात आले. उत्तर असे आहे की आपण प्रकाश व प्रेम तर सदैव पाठवू शकतो. इथे आपण एक मोठा बोध घ्यायला हवा आणि तो म्हणजे भौतिक देहाला मर्यादा असतात व स्वतःच्या नियमांचे बंधन असते. शिवाय, जर आत्म्याची इच्छा असेल तर तो देहात राहतो, नाहीतर देह सोडून जातो. एका विवक्षित पातळीवर सर्व आध्यात्मिक गुरुंचे कार्य एकच असते. त्यामुळे, सत्यसाईबाबांच्या तब्येतीची काळजी सर्व ऋषींना आहे. ऋषी त्यांच्यासोबत आहेत.

एका माणसाची तक्रार होती की मोहिनीविद्येत प्रवीण असणाऱ्या माणसाने त्याच्या आयुष्याचे खूप नुकसान केले. आमच्याकडे आल्यावर तुम्हाला सर्व प्रकारे मदत व मार्गदर्शन मिळते. एकदा आमच्याकडे आल्यानंतर तुम्ही त्या मोहिनीविद्यावाल्याकडे गेलातच का? ज्योतिषी आपल्याला मदत करतात. देवता, अष्टदिक्पालकांसारखे देव निःसंशय महान आहेत. पण, ते आपल्याला आध्यात्मिक मार्गदर्शन देऊ शकत नाहीत. फक्त ऋषीच ते देऊ शकतात. ऋषी आपल्याला थेट ईश्वरापर्यंत नेतात.

शांतीपूर्ण दैनंदिन जीवन जगण्यासाठी तुम्ही भावनांवर आणि मानवी नातेसंबंधांवर ताबा ठेवला पाहिजे; टोकाच्या भावना टाळल्या पाहिजेत. सर्व नातेसंबंध सुसंवादी असले पाहिजेत. आपल्या आध्यात्मिक प्रगतीच्या आड येणारी नाती आपण तोडूनही टाकू शकतो. आपण तीन साध्या गोष्टींचे अवलंबन केले पाहिजे – नित्यनेमाने ध्यान करणे, सकारात्मक बनणे आणि शंबला तत्त्वांचे पालन करणे.

तुमच्या अंतरीच्या सत्त्वाची भेट होण्यासाठी अंतर्मुख व्हा व त्याचा अनुभव घ्या. हे जणू या सृष्टीच्या गाभ्याची भेट होण्यासारखे आहे. तेव्हा तुम्हाला समजते की ह्या जीवनाचा काहीतरी हेतू आहे. ही समज तुमच्या जीवनाची दिशाच बदलून टाकते. तुमच्या जीवनात आनंद अवतरतो व तुम्ही तुमच्या आध्यात्मिक प्रवासाला सुरुवात करता. आध्यात्मिक मार्गात तुम्ही वेगाने पुढे जाता आणि तुम्हाला समजते की ऋषी व ईश्वर हेच तुमचे खरे सोयरे होत.

गेल्या वर्षी आम्ही सांगितले होते की ह्या वर्षाच्या मे महिन्यापर्यंत आपली सर्व कर्मे संपली पाहिजेत. कर्मे संपविण्यासाठी नियमित ध्यान पुरेसे आहे. पुढच्या वर्षाच्या मध्यापर्यंत महत्त्वाची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. २०१२ साल जवळ येत आहे. दीर्घकालीन योजना हाती घेऊ नका. आध्यात्मिक प्रगतीवर भर द्या.

आमचे कार्य जागतिक स्वरूपाचे आहे व ते सूक्ष्म स्तरावर चालते. अण्णा हजारेंनी उभी केली तशी चळवळ आम्ही कधीही उभारणार नाही. या पृथ्वीवरच्या अशा तऱ्हेच्या चळवळींना आम्ही पाठिंबा देतो. ध्यान करा, नवीन सत्ये समजून घ्या. जगाकडे प्रकाश प्रवाहित करणे हे आपले कार्य आहे. आपल्यावर जास्त मोठी जबाबदारी आहे. आपण ऋषींनी निवडलेली सौम्य माणसे आहोत.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

१७-०४-२०११

भ्रष्टाचाराची लाच घेण्याव्यतिरिक्त इतरही अनेक अंगे आहेत. अपवित्र असणे आणि निसर्गाशी विसंवादी असणे हा भ्रष्टाचार आहे. आपले नियत कार्य आपण नीट करत नसलो किंवा नियमित साधना करत नसलो तर आपण भ्रष्ट आहोत. प्रेम हा आपला स्वभाव आहे. जर आपल्या वर्तनातून आपण निष्प्रेम प्रकट केले तर आपण भ्रष्ट आहोत. आपण दिलेले वचन पाळत नाही तेव्हा आपण स्वतःला भ्रष्ट म्हणू शकतो. अशा रीतीने भ्रष्टाचार सर्वत्र बोकाळला आहे.

इतरांशी संवाद साधताना जर आपण वरकरणी काळजी घेत असू तर आपण स्वतःची खोटी प्रतिमा, खोटे बाह्य स्वरूप प्रक्षेपित करत असतो. आपण संवाद साधताना स्वाभाविक असले पाहिजे. जेव्हा लोक वागताना काळजी घेतात आणि त्यांचे हास्य जेव्हा वरवरचे व कृत्रिम असते तेव्हा तिथे कोणतेही नाते अस्तित्वात नसते. माणसाला वागताना अशी काळजी घ्यावी लागू नये. मुद्दा असा आहे की आपण देवाजवळ, मित्राजवळ, किंबहुना कोणाजवळही ढोंग करूया नको.

आपले दैनंदिन जीवन शांतीपूर्ण आणि आध्यात्मिक बनविण्यासाठी आपण साधना सुरू केली आहे. इथे आपल्याजवळ ज्ञान, ऊर्जा, तंत्रे, साहाय्य आणि आधार आहे. एवढं सर्व असतानासुद्धा जर आपण आनंदी नसलो तर आपलं काहीतरी चुकतं आहे. आपल्या दैनंदिन जीवनात आता जर आपण शांती प्राप्त करू शकलो नाही तर यानंतर आपण कधीच मुक्ती किंबहुना काहीच प्राप्त करू शकणार नाही.

आपण सहज शांती मिळवू शकतो. परंतु, त्यासाठी साधनेचा काळ २४ तासांपर्यंत वाढवून आपल्याला प्रयत्न करावे लागतील. प्रलयाचा काळ कमी झाल्यामुळे आपल्यापाशी फारसा वेळ उरलेला नाही. ध्यान करा, सकारात्मक व्हा, अंतर्यामी नेहमी प्रकाश आणि प्रेम धारण करा. अंतःकरणापासून उमलणारे हास्य नेहमी तुमच्या चेहऱ्यावर विलसूदे. तुमच्या अंतरंगात प्रकाश ठेवा आणि झोपी जा. संपूर्ण रात्रभर प्रकाश तुमच्यासोबत असेल.

चेतनेच्या महासागरात काळ आणि अवकाश नसतात. दुसऱ्या तारामंडळात किंवा भौतिक ब्रह्मांडात कुठेही असलेल्या एखाद्या माणसाशी संपर्क साधण्याकरिता आपल्याला या चेतनेच्या महासागरात प्रवेश करावा लागतो. त्यानंतर, तुम्ही त्या माणसाशी संपर्क करू शकता. तिथे काळ व अवकाश लुप्त होतात. ध्यानामुळे आपण शांती, स्तब्धता आणि त्यानंतर चेतनेच्या महासागराप्रत जाऊन पोहोचतो.

मला एका माणसाने मदतीसाठी विनंती केली. त्याने स्वतःच्या आयुष्याची पार वाट लावली होती आणि तो फार हताश झाला होता. तो माणसांचा व आयुष्याचा तिरस्कार करू लागला होता. कधीकधी असे होते. एखाद्या माणसाला मदत करण्याचे ठरविण्याआधी आपल्याला त्या माणसाशी बोलावे लागते. त्यासाठी तो माणूस तयार पाहिजे, त्याने या प्रक्रियेत भाग घेतला पाहिजे आणि मोकळेपणाने मन उघडे केले पाहिजे. असे न झाल्यास कोणीही त्याला साहाय्य करू शकणार नाही, अगदी देवसुद्धा नाही.

विनायक सेन यांना अकारण तुरुंगात डांबले होते व त्यांना जामीनसुद्धा नाकारण्यात आला. पण सर्वोच्च न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. ह्या देशात आपल्याला अंधुक आशा दिसते आहे. अशा गोष्टी समजून घेणे हाही साधनेचा भाग आहे. साधना म्हणजे सत्याचा शोध. सत्य हे आहे की विनायक सेन निर्दोष आहेत. इथे प्रकाश प्रवहनाची मदत होते. प्रेम व प्रकाशाचे नवीन जग निर्माण करण्याकरिता आपण अधिक जोमाने प्रकाश प्रवहन करूया.

२४-०४-२०११

आताच्या या प्रगत काळात चक्रं आपोआप कार्यान्वित होतात. ती जेव्हा जागृत होतात तेव्हा आपल्याला सिद्धी मिळतात. परंतु, आध्यात्मिक ध्येय गाठण्यापासून विचलित होऊ नये म्हणून आपण सिद्धी समर्पण करतो. चक्रं कार्यान्वित झाल्यानंतर आपल्याला मिळणारे फायदे असे आहेत: मूलाधार चक्र आपल्या भावनांना व विचारांच्या क्रियेला स्थैर्य देते. हे सुज्ञतेमुळे घडते. स्वाधिष्ठान चक्र आपली निर्मितीक्षमता वाढवते. मणिपूर चक्र नीट व्यवस्थापन करण्यात व आयुष्य आणि भावनांवर ताबा ठेवण्यात मदत करते. अनाहत चक्र आपले लक्ष पारमार्थिक सत्यांकडे वळविण्यात मदत करते. विशुद्धी चक्र उच्च अनुभवांचा गांभीर्याने मागोवा घेण्यात आपली मदत करते जेथून आपण परत माघारी फिरत नाही. आज्ञा चक्र जागृत होण्याने नवचेतनेचा उद्भव होतो. आपल्या पारमार्थिक मागोव्याच्या मार्गात आपण घट्ट पाय रोवून उभे राहतो. सहस्रार चक्र जागृत झाल्यावर आपल्याला आनंद व समाधान लाभते.

आपण कोणाकडे प्रकाश पाठवला तर तो मदत करतो, पण त्या व्यक्तीमध्ये बळजबरीने बदल घडवून आणत नाही. परिवर्तनाची निवड त्या व्यक्तीने करावी लागते.

थोडा राग येणे ठीक आहे. तो मानवी स्वभावाला धरून आहे. परंतु, रागाचा विस्फोट मेंदूच्या पेशींना हानी पोचवतो. रागाच्या विस्फोटाचे पुनरावर्तन आपले व्यक्तिमत्त्व आणि आपल्या वृत्तींना बदलवते.

एका माणसाची इच्छा आहे की मी त्याला दीक्षा द्यावी. त्याला वाटते की दीक्षा मिळाल्यामुळे त्याला नियमित ध्यान करण्यात व सुस्ती दूर होण्यास मदत होईल. हे समज चुकीचे आहेत. दीक्षेमुळे मदत होते, पण प्रयत्न आपल्यालाच करावे लागतात. तरीही यश मिळाले नाही तर आपण जास्त प्रयत्न करायला हवे.

लोकांना असेही वाटते की दोन दिवस तपोनगरात राहून त्यांना ध्यान शिकता येईल. ध्यान समजून घ्यायला कदाचित अख्खे आयुष्यसुद्धा पुरे पडणार नाही. लोकांचे असे सर्व गैरसमज असतात.

एका माणसाने त्याच्या समस्याग्रस्त नातेवाईक स्त्रीकरिता मदत मागितली. ती स्त्री चांगली व्यक्ती आहे. परंतु तिचा ऋषींवर, या मार्गावर किंवा साधनेवर विश्वास नाही आणि ती कोणती साधनाही करत नाही. अशा तऱ्हेची विनंती करण्याआधी तुम्ही दोनदा विचार करायला हवा.

आध्यात्मिक गुरुंना त्यांच्या जीवनकालात कधीही पूर्णपणे समजून घेतले जात नाही. आपण त्यांना देवत्व बहाल करतो, त्यांची व्यक्तीपूजा सुरू करतो व अशा रीतीने आपल्या दोघात अंतर निर्माण करतो. आपण त्यांची पूजा करावी ही त्यांची अपेक्षा नसते. त्यांची अपेक्षा असते की आपण त्यांना अनुसरावे, त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालावे.

मृत्युपश्चात आत्मा पृथ्वीवर सहसा १० दिवस राहतो. त्यानंतर विशेष मार्गदर्शकांकरवी त्याला दूर नेण्यात येते. पण, आध्यात्मिकदृष्ट्या प्रगत आत्मे बहुधा मृत्युनंतर लगेचच परलोकी जातात कारण, ते आधीपासूनच विरक्त अवस्थेत असतात. प्रत्येक मृत्यु आपल्याला अनेक सत्यांबाबत विचार करायला लावतो. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क ७०० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- ★ सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ★ ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- ★ सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- ★ मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- ★ मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- ★ साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा. बाहेरगावचे चेक असल्यास रू. ५० अधिक जोडावे.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- ★ विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- ★ प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- ★ प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ★ ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ★ ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## एक रविवार

प्रगती राज, अनुवाद : पूर्वा फडके

कोण म्हणतं की उत्सव फक्त कॅलेंडरमध्ये दाखवलेल्या तारखांनाच साजरे करता येतात?

शहरातील रहिवाश्यांच्या धकाधकीच्या जीवनापासून लांब, ताणतणाव, कटकारस्थानं आणि फसवणूकीपासून लांब अशी एक छोटीशी अपरिचित, शहरापासून लपलेली निसर्गरम्य जागा आहे. येथे पक्षी आनंदाने विहार करतात, चिवचिवतात, येथे फुले दिमाखात मोहोरतात, येथील महाकाय वृक्ष निःशब्दपणे उभे असतात आणि गवतही आनंदात वाढते. फक्त मोजक्याच भाग्यवंत लोकांना माहीत असलेली ही जागा दर रविवारी महोत्सव साजरा करते. हा आनंदाचा सोहळा प्रगाढ शांततेत साजरा होतो. आनंदोत्सव आणि शांतता या परस्पर विरोधी भासणाऱ्या गोष्टी येथे एकत्र नांदतात.

रविवारी सकाळी ही जागा एरवीपेक्षा लवकर साफ केली जाते. कुठलीही सजावट केली नसूनही असं वाटतं की ही जागा सोहळा साजरा करण्यासाठी सज्ज होत आहे. तपोनगर ही छोटीशी विलक्षण जागा सर्व साधकांना आलिंगन देऊन त्यांचे स्वागत करण्यास उत्सुक असल्यासारखी वाटते.

सकाळी १०च्या सुमारास बहुधा शुभ्र वस्त्र परिधान केलेले साधक शांतपणे येतात व हळुवार, मृदु आवाजात एकमेकांना अभिवादन करतात. स्मितहास्यपूर्वक एकमेकांना भेटतात. ११ वाजत आले की लोक एका विशिष्ट हॉलकडे जाऊ लागतात. रविवारच्या ज्या क्षणाची लोक आतुरतेने वाट पाहत असतात, तो क्षण जवळ आलेला असतो. घड्याळात ११चा टोला पडताक्षणी साधेपणाच्या वैभवाने परिपूर्ण, प्रेम, प्रकाश व विनम्रतेचा महासागर सोबत घेऊन सफेद वस्त्र परिधान केलेला एक महात्मा निःशब्द पावलांनी सावकाशपणे हॉलमध्ये प्रवेश करतो. ते सावकाशपणे आसनस्थ होतात आणि त्यांच्यासमोर बसलेल्या प्रत्येकाचे मन आनंद व प्रेमाने भरून जाते. होय ! हाच तो क्षण, ज्याची प्रत्येकजण अधीरतेने वाट पाहत असतो.

काही लोकांसाठी त्यांची उपस्थिती पुरेशी असते तर काहींना त्यांच्या सत्य शोधक प्रश्नांवर गुरुजींनी दिलेली उत्तरे समाधान देतात, तर काहींना केवळ त्यांच्या आजूबाजूला असणंच आनंद मिळवून देतं. त्यांच्या सहवासात ११ ते १२ ही वेळ एखाद्या विजेच्या चमकण्याइतकी पटकन निघून जाते. या दरम्यान ते लोकांना हसवतात, त्यांच्यावर प्रेम आणि दयेचा वर्षाव करतात आणि चिंतन करायला लावणाऱ्या गोष्टी सांगतात. आणि या नंतर त्यांच्या सहवासात उत्सव सुरू होतो शांततेचा. काही वेळानंतर ते महान आध्यात्मिक गुरु तितक्याच शांतपणे हॉलमधून बाहेर पडतात जितक्या शांतपणे त्यांनी प्रवेश केला होता. गुरुजी अत्यंत महान आध्यात्मिक गुरु आहेत. त्यांचं वर्णन करायला शब्द अपुरे पडतात.

या महान गुरुंनी ही शांत, सुंदर जागा १९८८ पासून क्रमाक्रमाने साकारली. त्यांनी अथक परिश्रम केले, श्रद्धेच्या बळावर सर्व शक्तीनिशी निराशेच्या वादळी वाऱ्याशी धैर्याने दोन हात केले. प्रतिकूल परिस्थितीतही ते डगमगले नाहीत आणि आकाशाला गवसणी घालणारी आध्यात्मिक उंची त्यांनी प्राप्त केली. त्यांच्या कष्टांची फळे आज आपल्याला चाखायला मिळत आहेत.

काहीवेळा प्रत्येकजण विचारात पडतो – ते मानवच आहेत ना? कदाचित नसावेत! याच ग्रहावरचे आहेत ना? कदाचित नाही! ते किती दिव्य आणि ईश्वरतुल्य भासतात.

साधारण १ वाजता शांततेचा सोहळा संपन्न झाल्यावर पोटात कावळे ओरडू लागले असतात. सर्वजण भोजनगृहाकडे जातात. तेथे एकमेकांची विचारपूस करत आनंदाने भोजनाचा आस्वाद घेतात. हे सर्व साधक प्रेमाच्या धाग्याने जोडले गेले आहेत.

दुपार सरताना प्रत्येकजण वेगवेगळ्या वास्तूंमध्ये जाऊन ध्यान करतो आणि आपल्या अंतरंगाशी एकरूप होण्याचा प्रयत्न करतो. सूर्य जसजसा सावकाशपणे पश्चिमेकडे सरकू लागतो, दुपारची जागा एक प्रसन्न संध्याकाळ घेते. ध्यानसाधक आपल्या मृदु, प्रसन्न आणि समाधानी आवाजात एकमेकांचा निरोप घेतात आणि या 'घरातून' आपापल्या घराकडे प्रस्थान करतात.

स्वतःशीच स्मित करत तपोनगर पुन्हा एकदा त्याच्या निगूढ शांततेकडे वळते आणि पुढील रविवारच्या शांतता सोहळ्याची वाट बघते. ■

## प्रश्नोत्तरे

संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे

**प्र. इतर ग्रहांवर जीवनशक्ती आहे का?**

उ. होय. या सृष्टीत सर्वत्र, सर्व ग्रहांवर जीवनशक्ती आहे. ही जीवनशक्ती म्हणजे पंचतत्त्वांप्रमाणेच आणखी एक तत्त्व म्हणजे सहावे तत्त्व आहे.

**प्र. आपल्या या पृथ्वीची काय वैशिष्ट्ये आहेत?**

उ. या पृथ्वीवर विविधता आहे. इथे पर्वत, नद्या, पक्षी, फुलपाखरे आहेत. इथे चांगल्या आणि वाईट या दोघांसाठी समान संधी आहेत. या पृथ्वीवर लोक आव्हानांचा, प्रयत्नांचा अनुभव घेण्यासाठी येतात, कारण असे अनुभव इतर सर्व पृथ्वींवर उपलब्ध नाहीत. इथे भावना आहेत, संवेदना आहेत आणि कल्पकता आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इथे आशा आहे.

**प्र. आपल्या भावना साधनेच्या मार्गात येऊ शकतात का?**

उ. भावना अत्यंत महत्त्वाच्या आहेत आणि त्यांची गरज पण आहे. पण कधीकधी आपल्या तीव्र भावना आपल्या साधनेच्या आड येतात. ते सर्वस्वी आपल्यावर अवलंबून असते. समाधीचा अनुभव घेण्यासाठी आपल्याला केव्हानकेव्हा भावनांच्या पार जावे लागेल. समाधी हा साधनेतील पहिला टप्पा आहे.

**प्र. आपण आध्यात्मिक अज्ञान दूर कसे काय करू शकतो?**

उ. ज्ञानाचा प्रकाश आध्यात्मिक अज्ञानाला दूर करतो. ज्ञान प्राप्त करण्यासाठी आपण प्रयत्न करायला हवे, प्राचीन ज्ञान असलेली पुस्तके व त्याचप्रमाणे नवे ज्ञान असलेली पुस्तके सुद्धा वाचायला हवी. आपण आपले मन खुले ठेवायला हवे. आपण सातत्याने ध्यान करायला हवे, कारण ध्यानाने आपल्या जास्त ज्ञान बाळगण्याच्या क्षमतेत अजून वाढ होते.

**प्र. देव आणि देवता ह्या खरंच अस्तित्वात आहेत का की, ते आपल्या कल्पनेचाच एक आविष्कार आहेत?**

उ. सर्वोच्च आध्यात्मिक गुरु असलेल्या आपल्या ऋषी-मुनींनी आपल्याला सांगितले आहे की, ही सृष्टी, विविध जगे ही प्रकाशातून जन्मली आहेत आणि परमेश्वराने वेगवेगळ्या देव देवतांच्या अनेक रूपात स्वत:ला प्रकट केले.

**प्र. ऋषींचे कार्य करण्यासाठी मी कोणत्या गोष्टीचा त्याग करायला हवा?**

उ. ऋषींचे कार्य करण्यासाठी आपल्याला आपल्या अहंकाराला त्यागावे लागेल; आपल्या वैयक्तिक हेतूला बाजूला ठेवून समर्पण करावे लागेल. सर्व प्रकारच्या बंधनांना तिलांजली द्यावी लागेल, आपला स्वार्थीपणा, नकारात्मकता आणि अंधश्रद्धांना आपल्याला सोडावे लागेल. आपल्याला ऋषींच्या हातातील साधन बनावे लागेल.

**प्र. आपण क्रिकेटच्या खेळाडूंकडे प्रकाश प्रवाहित करू शकतो का?**

उ. आपण विश्वकल्याणासाठी प्रकाश प्रवाहित करतो. प्रकाश कोणाचाही पक्ष घेत नाही. तुम्ही प्रार्थना करू शकता आणि तुमचे विचार व शक्ती खेळाडूंकडे पाठवू शकता. ही एक सकारात्मक कृती असायला हवी.

**प्र. आपण लौकिक ध्येय साध्य करण्यासाठी प्रकाश पाठवू शकतो का?**

उ. आपण केवळ प्रार्थना करणे आणि प्रकाश सोबत बाळगणे पुरेसे आहे. कधीही लबाडी करू नका. म्हणजेच कोणत्यातरी विशिष्ट हेतुने कोणाकडे प्रकाश पाठवू नका. प्रकाशाकडे स्वत:ची प्रज्ञा असते आणि तो तुमच्या अवाजवी मागण्या पूर्ण करणार नाही. प्रकाशाला व्यवस्थित समजून घ्या.

**प्र. कशामुळे आपले शब्द जास्त प्रभावी होतात?**

उ. जर तुम्ही सत्य बोलत असाल तर शब्दांचा पूर्ण प्रभाव पडतो. जेव्हा तुम्ही पवित्र असता आणि तुमचा हेतू शुद्ध असतो तेव्हा तुमच्या शब्दांमागे जास्त शक्ती असते.

**प्र. आपण परमेश्वराची कृपा कशी मिळवावी?**

उ. परमेश्वराची कृपा आपल्याला तेव्हा मिळते जेव्हा आपण प्रकाश सोबत बाळगण्यासाठी, त्याला अनुभवण्यासाठी, आपल्या आचरणातून त्याला व जीवन शक्तीला प्रकट करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करायला सुरुवात करतो. परमेश्वराची कृपा नेहमीच आपल्याकडे येण्यासाठी तत्पर असते, पण आपणच आपल्या नकारात्मक विचारांमुळे व भावनांमुळे त्यात अडथळा आणतो. आपण कृपा प्राप्त करण्यासाठी आपले मन खुले ठेवायला हवे.

**प्र. नवयुगात कर्मकांड असेल काय?**

उ. नाही. नवयुगात फक्त प्रेमाचे साम्राज्य असेल. तुम्ही प्रचंड प्रमाणात प्रकाश व प्रेम बाळगाल त्यामुळे देवाशी तुमचा कोणत्याही मध्यस्थाच्या मदतीशिवाय प्रत्यक्ष संपर्क होईल. ■


### आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 3 | 150/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis Vol-2 | 150/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| आय्गुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)
मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१-२८६-१८९०/२४४-९५८५)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)
गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)
द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)
द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)
उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)
यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

## मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

## मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

"मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र इथे तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

## अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

## स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

## ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

## भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

## अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०-जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2010-11
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8

# आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानाडे)

गुरुजींनी जेव्हा पुण्याला भेट दिली, तेव्हा माझ्याकडे पाहुणे असल्यामुळे, त्यांच्या सत्संगात मला सहभागी होता आले नाही. मी अतिशय बेचैन झाले व मला अस्वस्थ वाटू लागले. मी माझ्या खोलीत गेले व बसून फक्त गुरुजी व ऋषींबद्दल विचार करू लागले. मग एक शक्तिशाली प्रकाश माझ्या खोलीत प्रवेशला व त्यापाठोपाठ खोलीत पूर्ण शांतता पसरली. मी अतिशय शांत व आनंदी झाले. गुरुजींनी हा अनुभव मला दिला. मला असे वाटले की त्यांच्या कृपेशिवाय असा उत्कृष्ट अनुभव शक्य नव्हता.

– शशिकला साईनाथ

माझ्या बागेतील एका झुडुपाला कीड लागल्याने ते पूर्णपणे निस्तेज झाले होते. त्याच्यावर उपचार केल्यानंतर ते बरे झाले पण त्याला फुले येईनात. काही दिवसांपूर्वी मी त्या झुडुपाशी मानसिक पातळीवर संवाद साधला व विनंती केली की त्याने देवपूजेसाठी मला काही फुले द्यावीत. आज मी त्या झुडूपावर सहा कळ्या उगवलेल्या पाहिल्या!

– नंदिता पटेल

१४ मार्च २०११ रोजी गाडी चालवीत असताना मला एकाएकी अतिआनंदी वाटू लागले. मी माझ्या अवतीभोवती ज्याकोणाकडेही पाहिले ते सर्व आणि ज्या कुठल्याही गोष्टीकडे पाहिले त्या सर्व गोष्टी मला आनंदी असल्यासारख्या वाटत होत्या. मी स्मित करत होतो आणि नकळतच मी मोठ्याने हसू देखील लागलो! मग अचानकच माझ्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. प्रत्येकाला मिठी मारुन त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करावा असे मला वाटले. मी जे अनुभवत होतो त्याची अनुभूती त्यांनीही घ्यावी असे मला वाटले.

– विश्वास दीक्षित

तपोनगरातील ध्यानाचे सत्र संपण्यापूर्वी, माझ्या डोक्यावर पुष्पवृष्टी होत असल्याचे मला जाणवले. माझ्या शरीराला स्पर्श करणाऱ्या भगव्या वस्त्रांची सळसळ मला जाणवली. मी वर पाहिले तेव्हा बरेच ऋषी वरून ध्यानवर्गात जमलेल्या प्रत्येक व्यक्तीवर फुलांचा व आशीर्वादांचा वर्षाव करीत असताना मला दिसले.

– जी. लक्ष्मण

मागील आठवड्यात ध्यानादरम्यान एका दृष्टांतात मी पाहिले की, गुरुजी प्रकाशरूप झाले आहेत. माझ्या लक्षात आले की गुरुजींना भेटण्याकरिता मलाही प्रकाश बनावे लागेल. प्रकाशरूपी गुरुजींचा आकार हळूहळू वाढत जाऊन कॉस्मिक टॉवर एवढा झाला व पूर्णपणे प्रकाशाने व्याप्त झाला. मी एक प्रकाशकण झाले होते आणि प्रकाशरूपी गुरुजींमध्ये प्रवेश करून त्यांच्याशी एकरूप झाले. नंतर हळूहळू सर्व साधक प्रकाशकण झाले आणि प्रकाशरूपी गुरुजींमध्ये प्रवेश करून त्यांच्याशी एकरूप झाले.

– लतिका कुलकर्णी

ध्यान करताना मला एक दृश्य दिसले. त्या दृश्यात मला एक खोली दिसली. त्या खोलीत ध्यानासाठी आसने मांडलेली होती व तिथे एक व्यक्ती ध्यान करताना दिसली. जेव्हा मी माझे चक्र जागृत केले तेव्हा त्या व्यक्तीचे चक्र देखील जागृत झाले. माझ्या लक्षात आले की ती व्यक्ती इतर कोणी नसून मीच होते! ते शरीर स्थिर होते व काही शक्तींनी बनलेले होते. मला शांत राहण्याची सूचना मिळाली. मग मला एक प्रकाशाचे शहर दिसले व तिथे लहान मुले दिसली. त्यानंतर माझ्या डोक्यावर लिंगासारखा दिसणारा गोळा माझ्या दृष्टीस पडला.

– मेरी लुइस

१९-०३-२०११ रोजी माझ्या स्वप्नात मी माझ्या मोबाईलच्या बॅटरीचा शोध घेत होते. तेव्हा मला दैवी चेहरा असलेल्या एका व्यक्तीचे दर्शन घडले. तो इतकी स्थिरचित्तता, शांती व प्रेम स्पंदीत करीत होता की त्याला चेहरा नसताना देखील, मी त्याच्या चेहऱ्याच्या दिशेने पाहतच राहिले. नेहमी शांत अवस्थेत राहणाऱ्या महाविष्णूंच्या सान्निध्यात असल्यासारखे मला वाटत होते. त्यांनी मला सांगितले, "तू परमेश्वराशी एकरूप होशील." त्यांनी हे देखील सांगितले, "एप्रिल १४ रोजी एक नवी सुरुवात होईल. बरेच मोठे बदल घडतील." त्यानंतर त्यांनी मला माझ्या मोबाईलची बॅटरी परत केली व सांगितले की, संवाद साधण्याकरिता मला मोबाईलची गरज पडणार नाही.

– विद्या विश्वामित्र

२२ एप्रिलला जेव्हा मी सूक्ष्मदेहाने तपोवनातील सप्तर्षी गुहेत प्रवेश केला, तेव्हा मला लांब केस असलेले, पांढरा गाऊन घातलेले एक वयोवृद्ध गृहस्थ दिसले. त्यांच्या अंगावर खूप जखमा होत्या. त्यांना पाहून मला खूप वाईट वाटले. मी घाबरले व मदतीसाठी गुरुजींना प्रार्थना करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी माझ्या मैत्रिणीने विश्वामित्र महर्षींना शक्ती अर्पण करण्यासाठी मला मॅसेज पाठवला कारण तो गुड-फ्रायडेचा दिवस होता. तेव्हा मला एकाएकी कळले की मला दिसलेले ते गृहस्थ अजून कोणी नसून स्वतः येशू-ख्रिस्तच होते!

– सुनिता कुमारी

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 200/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore-86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande